# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुलांबाबत

**(१) ६८७ (१८-०३-२०२०) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक ४४९९६ ला दिनांक २९ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री आवास योजनेतून सन २०२० अखेरपर्यंत ३६४२ घरकुले बांधण्याबाबत परभणी जिल्हयातील नगरपालिका व महानगरपालिका यांना उद्दिष्ट्ये देण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विविध अडचणीमुळे माहे जानेवारी, २०२० अखेर केवळ १०% घर बांधकामाची उद्दिष्ट्ये पूर्ण होवू शकले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नगरपालिका व महानगरपालिकास्तरावरील घरकुले बांधकामाची सद्य:स्थिती तसेच उपलब्ध करून देण्यात आलेल्या निधीची थोडक्यात माहिती काय आहे,

(४) असल्यास, घरकुल बांधण्याची गती वाढण्याबाबत शासनस्तरावरून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (०४-०२-२०२२) :** (१) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत परभणी जिल्ह्याकरीता २१७५१ घरकुलांचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. त्यापैकी केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने (CSMC) १४५४२ घरकुलांना मंजूरी दिली आहे. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत परभणी जिल्ह्याकरीता २१७५१ घरकुलांचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. त्यापैकी केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने (CSMC) १४५४२ घरकुलांना मंजूरी दिली आहे.

(२) व (३) प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत परभणी जिल्ह्यात मंजूर घरकुलांपैकी ७४४ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले असून ९०२५ घरकुलांचे काम प्रगतीपथावर आहेत. सदर मंजूर घरकुलांकरीता केंद्र शासनाचा रुपये ७५.६६३ लक्ष व राज्य शासनाचा रुपये १३४.१४ लक्ष इतका निधी संबंधित अंमलबजावणी यंत्रणांना वितरीत करण्यात आला आहे.

(४) प्रकल्प वेळेवर पूर्ण करण्याकरीता अभियान संचालनालय म्हणून महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) कडून पाठपुरावा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

## केंद्र शासनाने महिलांच्या सुरक्षेसाठी राज्य शासनास दिलेल्या निधीबाबत

**(२) ७२० (१८-०३-२०२०) श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने महिलांच्या सुरक्षेसाठी राज्य शासनास दिलेल्या निधी अंतर्गत आपातकालीन प्रतिसाद, यंत्रणा, सायबर गुन्ह्याविरोधी यंत्रणा, एक खिडकी योजना, महिला पोलीस स्वयंसेवकांची नेमणूक इत्यादी कामांसाठी केंद्र शासन, राज्य शासन व केंद्र शासित प्रदेशांना रुपये २ हजार २६४ कोटींचा निधी दिला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त निधीपैकी राज्य शासनास किती निधी मिळाला होता व केव्हा, राज्य शासनाने या निधी अंतर्गत कोणती कामे केली,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२८-१२-२०२१)** : (१) केंद्र शासनाकडून निर्भया निधी अंतर्गत प्राप्त झालेल्या निधीमधून पुढील ५ योजना राबविण्यात येत आहेत-

क) मुंबई शहर महिला सुरक्षितता पुढाकार योजना.

ख) महिला मदत कक्ष स्थापन करणे.

ग) अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष स्थापन करणे व त्यांचे बळकटीकरण करणे.

घ) सायबर क्राईम प्रिव्हन्शन फॉर वूमन ॲण्ड चिल्ड्रन

ड) डिएनए लॅबचे बळकटीकरण करणे.

(२) व (३) निर्भया निधी अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे-

| अ.क्र. | योजनेचे नाव | योजनेचा एकूण निधी (रूपये कोटीत) | केंद्र शासनाकडून प्राप्त निधी दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मुंबई शहर महिला सुरक्षितता पुढाकार योजना | २५२.०० (केंद्र हिस्सा : राज्य हिस्सा ६०:४०) | दिनांक २८/०९/२०१८ रोजीच्या पत्रान्वये रुपये ८७.४७ कोटी |
| २ | महिला मदत कक्ष | ७.०० (१००% केंद्र हिस्सा) | दिनांक १८/०३/२०२० रोजीच्या पत्रान्वये रुपये ७.०० कोटी |
| ३ | अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष | ५.०७ (१००% केंद्र हिस्सा) | दिनांक २९/०५/२०१९ रोजीच्या पत्रान्वये रुपये ४५.४८ लक्ष आणि दिनांक ०२/०६/२०२० रोजीच्या पत्रान्वये रुपये ४.६२ कोटी |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | सायबर क्राईम प्रिव्हन्शन फॉर वूमन ॲण्ड चिल्ड्रन | ४.५८ (१००% केंद्र हिस्सा) | दिनांक २८/०९/२०१७ रोजीच्या पत्रान्वये रुपये ०३.९४ कोटी, दिनांक १२/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये रुपये ५२.४० लक्ष आणि दिनांक २३/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये रुपये १२.०० लक्ष |
| ५ | डिएनए लॅबचे बळकटीकरण | ५३.७० (१००% केंद्र हिस्सा) | दिनांक ३१/०१/२०१९ रोजीच्या पत्रान्वये रुपये २०.६० कोटी, दिनांक ३१/०१/२०१९ रोजीच्या पत्रान्वये रुपये ६.२५ कोटी, दिनांक ०७/०२/२०२० रोजीच्या पत्रान्वये रुपये १०.७४ कोटी, दिनांक ०७/०२/२०२० रोजीच्या पत्रान्वये रुपये १६.११ कोटी |

क) मुंबई शहर महिला सुरक्षितता पुढाकार योजना- सदर योजनेचा आराखडा अंतिम करण्याची कार्यवाही सुरू असून, अंतिम आराखडा केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.

ख) महिला मदत कक्ष- पिडीत महिलांच्या मदतीकरीता राज्यातील ७०० पोलीस स्टेशनमध्ये महिला मदत कक्ष स्थापन करण्याची कार्यवाही सुरू आहे.

ग) अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष- दिनांक २५/०८/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात ४५ अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षांची स्थापना करण्यात आली आहे. सदर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षांच्या बळकटीकरणासाठी निधी वितरित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

घ) सायबर क्राईम प्रिव्हन्शन फॉर वूमन अॅण्ड चिल्ड्रन- राज्यातील महिला व बालकांचे सायबर गुन्ह्यांपासून प्रतिबंध करण्यासाठीच्या उपाययोजनांतर्गत मुंबई येथे प्रशिक्षण व न्यायसहाय्यक प्रयोगशाळा स्थापन करण्यात आली आहे.

ङ) डिएनए लॅबचे बळकटीकरण- राज्यातील ८ प्रादेशिक न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळांमध्ये डिएनए विश्लेषण कक्ष स्थापन करण्यात आले आहेत.

सायबर क्राईम प्रिव्हन्शन फॉर वूमन अॅण्ड चिल्ड्रन या योजनेची अंमलबजावणी पूर्ण झाली आहे. अन्य ४ योजनांची अंमलबजावणी सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई, ठाणे, पुणे व नागपूर येथील मेट्रोच्या कामाबाबत

**(३) १४८७ (१८-०३-२०२०) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, ठाणे, पुणे व नागपूर शहरात सुरू असलेल्या सर्व मेट्रो प्रकल्पांची कामे संथगतीने सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मेट्रो प्रकल्पांची कामे सध्या कोणकोणत्या ठिकाणी व कोणत्या स्वरूपात सुरु असून त्याची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकल्प पूर्ण होण्यासाठी एकूण किती निधीची आवश्यकता आहे व सद्य:स्थितीत किती निधी उपलब्ध झाला आहे,

(४) तसेच उपरोक्त प्रकल्प केव्हापर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे ?

**श्री.एकनाथ शिंदे (०७-०१-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे. मागील दोन वर्षापासून कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव, परिस्थिती व त्यामुळे मजुरांच्या अनुपलब्धतेमुळे मेट्रो प्रकल्प कामाच्या प्रगतीवर परिणाम झाला आहे.

(२) मुंबई महानगर प्रदेशामध्ये एमएमआरसीएल कडून देशातील एकमेव अशा ३३.५ कि.मी. लांबीच्या भुयारी मार्गाचे काम प्रगतीपथावर असून आतापर्यंत ६७% भौतिक प्रगती साध्य झाली आहे. त्याचप्रमाणे एमएमआरडीएमार्फत सुमारे १४४ कि.मी. लांबीच्या उन्नत मेट्रो मार्गिकांची कामे हाती घेण्यात आली आहेत. त्यापैकी मुंबई मेट्रो लाईन-२अ (दहिसर ते डी.एन.नगर) व मुंबई मेट्रो लाईन-७ दहिसर (पूर्व) ते अंधेरी (पूर्व) या मार्गिका प्रगतीच्या अंतिम टप्प्यात असून या मार्गिका प्रवाशी वाहतुकीसाठी लवकरच खुल्या करण्याचे नियोजित आहे. उर्वरित मेट्रो मार्गिकांची उभारणी गतीने सुरु असून सदर मार्गिका अंमलबजावणीच्या विविध टप्प्यात आहेत.

नागपूर महानगर प्रदेशात महामेट्रोमार्फत नागपूर टप्पा-१ अंतर्गत ३८.२ कि.मी. लांबीची मार्गिका हाती घेण्यात आली असून आतापर्यंत २६.६ कि.मी. लांबी प्रवासी सेवेसाठी खुली करण्यात आली आहे व उर्वरित लांबी लवकरच वाहतुकीसाठी खुली करण्याचे नियोजित आहे.

पुणे महानगर प्रदेशात महामेट्रो व पीएमआरडीए मार्फत मेट्रो प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. महामेट्रो मार्फत पुणे मेट्रो टप्पा-१ अंतर्गत ३३.२८ कि.मी. लांबीची अंशत: उन्नत व अंशत: भुयारी मेट्रो मार्गिकेचे काम प्रगती पथावर असून आतापर्यंत ६५ टक्के भौतिक प्रगती साध्य झाली आहे व त्यामधील प्राथम्य टप्पा लवकरच प्रवासी सेवेकरीता खुला करण्याचे नियोजित आहे. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत पीपीपी तत्वावर राबविण्यात येत असलेल्या २३.३ कि.मी. लांबीच्या उन्नत मेट्रो प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामास दिनांक २५ नोव्हेंबर, २०२१ पासून सुरुवात झाली आहे व आगामी ४ वर्षामध्ये सदर प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

(३) एमएमआरसीएल मार्फत राबविण्यात येत असलेल्या मुंबई मेट्रो लाईन-३ करीता राज्य शासनाकडून रुपये २४२१.१० कोटी इतके दुय्यम कर्ज दयावयाचे असून त्यापैकी मार्च, २०२१ अखेर रुपये १६७५ कोटी वितरीत करण्यात आले आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सुरु असलेल्या मुंबई मेट्रो-२अ, २ब, ४, ४अ, ५, ६, ७ आणि ९ व ७अ या एकूण अंदाजित रुपये ६०,८४२ कोटी खर्चाच्या प्रकल्पांसाठी राज्य शासनाकडून मुख्यत: केंद्रीय कर व राज्य/स्थानिक कर यावरील खर्चाच्या प्रयोजनार्थ सुमारे रुपये ११४३६

कोटीचे दुय्यम कर्ज देण्यात शासनाने मान्यता दिली असून सदर प्रकल्पांस आवश्यकतेप्रमाणे माहे मार्च, २०२१ अखेर रुपये ४०० कोटींचे दुय्यम कर्ज वितरीत करण्यात आले आहे. मुंबई मेट्रो-२अ, २ब व ७ प्रकल्पांसाठी एशियन व न्यू डेव्हल्पमेंट बॅक या आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थेकडून त्याचप्रमाणे मुंबई मेट्रो-४ व ४अ साठी केएफडब्लू, जर्मनी या वित्तीय संस्थांचे केंद्र शासनामार्फत कर्ज घेण्यात आले असून एमएमआरडीएच्या मागणीनुसार राज्यशासनाकडून कर्ज निधी वितरीत करण्यात येत आहे.

महामेट्रो मार्फत सुरु असलेल्या नागपूर मेट्रो टप्पा-१ (एकूण खर्च रुपये ८६८० कोटी) व पुणे मेट्रो टप्पा-१ (एकूण खर्च रुपये ११४२० कोटी) प्रकल्पांसाठी राज्य शासनाकडून रुपये १५६८ कोटी व रुपये २४२४ कोटी इतके अनुक्रमे दुय्यम कर्ज व समभाग स्वरुपात निधी दयावयाचा असून मार्च, २०२१ अखेर रुपये १२५० कोटी वरुपये १९८२ कोटी इतके अनुक्रमे दुय्यम कर्ज व समभाग स्वरुपात निधी वितरीत करण्यात आलेला आहे. सदर प्रकल्पांसाठी आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांचे कर्ज सहाय्य घेण्यात आले असून सदरचे कर्ज केंद्र शासनाकडून थेट महामेट्रोला उपलब्ध करण्यात येत आहे.

(४) मुंबई महानगर प्रदेशातील एमएमआरडीए मार्फत राबविण्यात येत असलेले मुंबई मेट्रो मार्गिका-२अ व ७ या मार्च, २०२२ पर्यंत व उर्वरित मार्गिका क्र. ४, ४अ, ५, ६, ९ व ७ अ या माहे जून, २०२४ पर्यंत कार्यान्वयित करण्याचे नियोजित आहे. पुणे मेट्रो मार्गिका टप्पा-१ हा माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत कार्यान्वयीत करण्याचे नियोजित आहे. नागपूर मेट्रो टप्पा-१ ची बहुतांश लांबी यापूर्वीच कार्यान्वयीत करण्यात आली असून उर्वरित लांबी रेल्वे सुरक्षा आयुक्तांची मान्यता प्राप्त झाल्यावर प्रवासी वाहतुकीसाठी खुली करण्यात येणार आहेत.

---

## कोल्ड स्टोरेज संदर्भात उपाययोजना करण्याबाबत

**(४) ५४५३ (१२-११-२०२०) डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्ड स्टोरेजमध्ये फळे, भाज्या, दुग्धजन्यपदार्थ तसेच मांस यांची साठवण केल्याने भाज्या जास्त वेळपर्यंत टिकून राहण्यास मदत होत असून फळे व भाज्यांची विक्री चांगल्याप्रकारे होत असल्याने कोल्ड स्टोरेजच्या व्यवसायास चालना मिळणे गरजेचे आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोल्ड स्टोरेज आजच्या काळाची गरज असल्याने यासंदर्भात केंद्र आणि राज्य शासनाचे स्पष्ट धोरण असूनही त्यास योग्य अशी चालना मिळत नसल्याने याबाबतीत सुटसुटीतपणा तसेच सूत्रता असण्याची गरज आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, तसेच यास किती दिवसांचा कालावधी लागणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (२३-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) सुटसुटीतपणा व सुत्रता आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## होलार समाजाच्या विविध मागण्यांची पूर्तता करणेबाबत

**(५) ८५९९ (१७-०६-२०२१) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) होलार समाज राज्यातील आदिम समाज असून त्यांनी लोककलेच्या समृध्द वारसा जपला आहे परंतु सद्य:स्थितीत त्यांना अनेक समस्यांचा सामोरे जावे लागत असल्यामुळे त्यांच्या मागण्यांची पूर्तता करण्याबाबत विधान परिषद सदस्यांनी दिनांक १४ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांना एका पत्राद्वारे विनंती केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पत्रामध्ये प्रामुख्याने होलार समाजातील लोकांच्या इतर जातीमध्ये लागलेल्या चुकीच्या जातीच्या नोंदी त्वरित दुरुस्त कराव्यात, समाजातील भूमिहीन कुटुंबांना पाच एकर जमीन कसण्यास देण्यात यावी,

समाजातील वृध्द कलावंतांना मासिक पाच हजार रुपये मानधन मिळावे, समाजातील प्रतिनिधीला राज्य मागासवर्गीय आयोग यामध्ये सदस्यत्व देण्यात यावे इत्यादी अनेक मागण्यांचा समावेश करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने होलार समाजाच्या मागण्या पूर्ण होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येणार आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (०३-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिकचे सिंचन व्यवस्थापन उपविभागीय कार्यालय वैजापूर येथे स्थलांतरित करण्याबाबत

**(६) ८६६६ (१५-०७-२०२१) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गंगापूर-वैजापूर (जि.औरंगाबाद) येथे भाव, भावली, वाकी व मुकणे या बांधलेल्या धरणाचे नियंत्रण नाशिकच्या मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग यांच्याकडे आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नाशिकचे सिंचन व्यवस्थापन उपविभागीय कार्यालय वैजापूर येथे स्थलांतरित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे निवेदन दिले असून विधानपरिषद अधिवेशनामध्ये विविध आयुधाद्‌वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नाशिकचे सिंचन व्यवस्थापन उपविभागीय कार्यालय वैजापूर येथे स्थलांतरित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (२७-०१-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) भाम, भावली, वाकी व मुकणे या चारही धरणांच्या जिल्हा नाशिक येथील नियंत्रण व व्यवस्थापन कार्यालयाच्या मुख्यालयात बदल न करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(७) ९३५९ (१५-०७-२०२१) श्री.अभिजित वंजारी, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यातील ४९ प्राथमिक आरोग्य केंद्रात लसीकरण मोहिम सुरु असून, ही मोहिम राबविताना रिक्त पदांमुळे अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये लसीकरणासाठी प्रशिक्षित आरोग्य कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२५-०१-२०२२) :** (१) प्राप्त अहवालानुसार हे अंशतः खरे आहे. रिक्त पदे आहेत ही बाब खरी आहे. तथापि, आरोग्य कर्मचाऱ्यांची रिक्त पदे असलेल्या ठिकाणी इतर उपकेंद्रातील आरोग्य सेविका यांची प्रतिनियुक्ती तसेच कंत्राटी तत्वावर नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच, व्हॅक्सीनेटर नेमण्यात येऊन जास्तीत जास्त लसीकरण करण्यात येत आहे.

(२) ग्रामविकास विभागाच्या दिनांक १४/०६/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील आरोग्य विभागाशी संबंधित गट क संवर्गातील पदे भरण्याबाबत जिल्हा परिषदांना परवानगी देण्यात आली असून त्यानुसार पदभरतीबाबतची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.
(३) कार्यवाही सुरू आहे.

---

## मंठा (जि.जालना) तालुक्यातील ट्रामा केअर सेंटरमध्ये अनेक पदे रिक्त असल्याबाबत

**(८) ९४५१ (१५-०७-२०२१) श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंठा (जि.जालना) तालुक्यातील ट्रामा केअर सेंटरमध्ये अनेक पदे रिक्त असल्यामुळे स्थानिक रुग्णांना उपचार मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ट्रामा केअर सेंटरमधील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२५-०१-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.
ग्रामीण रुग्णालय, मंठा येथील ट्रॉमा केअर सेंटरमधील रिक्त पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| पद | मंजूर पदे | रिक्त पदे | भरलेली पदे |
|---|---|---|---|
| वैदयकीय अधिकारी | ०२ | ०० | ०२ |
| अस्थीव्यंग शल्यचिकित्सक | ०१ | ०० | ०१ |
| भुलतज्ञ | ०२ | ०० | ०२ |
| परिसेविका | ०१ | ०० | ०१ |
| अधिपरिचारीका | ०३ | ०१ | ०२ |
| वाहनचालक | ०१ | ०१ | ०० |

| | | | |
|---|---|---|---|
| सफाईगार | ०२ | ०२ | ०० |
| कक्षसेवक | ०३ | ०० | ०३ |
| एकूण | १५ | ०४ | ११ |

(२) ट्रॉमा केअर सेंटर, मंठा येथे अधिपरिचारीका-०१ व वाहनचालक-०१ अशी दोन पदे रिक्त आहे. गट क संवर्गाची जाहिरात दिनांक ०५/०८/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून त्यात अधिपरिचारीका व वाहनचालक पदांचा समावेश आहे. गट क संवर्गाची दिनांक २४/१०/२०२१ रोजी लेखी परीक्षा घेण्यात आली असून गुणवत्ता पात्र उमेदवारांच्या नियुक्तीची कार्यवाही करण्यात येईल. तसेच सफाईगारांची सेवा बाह्य यंत्रणेमार्फत घेण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र राज्य वीज वितरण व इतर दोन वीज कंपन्यातील वर्ग-३ व वर्ग-४ मधील पदांसह अन्य सवंर्गातील हजारो पदांच्या रिक्त जागा भरण्यास विलंब होत असल्याबाबत

**(९) ९७६१ (१७-०६-२०२१) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य वीज वितरण व इतर दोन वीज कंपन्यातील रिक्त जागा भराव्यात म्हणून महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनकडून मागील १० वर्षापासून सातत्याने निवेदने, आंदोलने व मोर्चाद्वारे मागणी करण्यात येत असून आकृतिबंध आराखडा मंजूर नसल्याने महावितरणमधील २५ हजार रिक्त पदांची भरती प्रलंबित असल्याची बाब दिनांक ७ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली असून, महावितरणमधील रिक्त पदांमुळे उत्पादन वाढीत अडसर निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वर्ग-३ व वर्ग-४ मधील पदांसह अन्य सवंर्गातील हजारो पदांच्या जागा रिक्त असून विद्युत सहाय्यक पदाच्या प्रतिक्षेत असलेले हजारो उमेदवार नियुक्तीची वाट पहात आहेत त्याचप्रमाणे महापारेषणमध्ये

८५०० नवीन व रिक्त पदे भरणार अशी घोषणाही करण्यात आली तसेच आकृतिबंध आराखडा मंजूर होऊन १० वर्ष नंतरही तो आजमितीस लागू करण्यात आलेला नसल्याने व जागा भरण्याचा निर्णय घेतला जात नसल्यामुळे दिनांक ४ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास मुंबईतील प्रकाशगडसमोर राज्यातील हजारो बेरोजगार विद्युत सहाय्यकाची भरती तात्काळ करावी म्हणून आंदोलनही करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१४ मध्ये २५०० उपकेंद्र सहाय्यक पदाची जाहिरात निघून देखील भरती रद्द झाली असून सन २०१९ मध्ये विद्युत सहाय्यक व उपकेंद्र सहाय्यक ७ हजार पदाची भरतीची प्रक्रिया सुरू करुन एक वर्षानंतरही शासनाने व महाराष्ट्र कंपनीने भरतीची प्रक्रिया पूर्ण केलेली नाही तसेच पगारवाढ करार करताना तिन्ही कंपनीचे व्यवस्थापनाने प्रत्येक वर्षी टप्प्या-टप्प्याने रिक्त जागा भरण्याचे मान्य केले असतानाही त्याची आजमितीस पूर्तता करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्याच्या ऊर्जा विभागातील तीनही कंपन्यांचा आकृतिबंध आराखडा तातडीने मंजूर करून रिक्त पदांची भरती प्रक्रिया सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२०-०१-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे. महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीसिटी वर्कर्स फेडरेशनमार्फत विविध विनंत्या व निवेदने सादर केली आहेत. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी (महावितरण), महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनी (महापारेषण) व महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी (महानिर्मिती) मध्ये वर्ग ३ व ४ ची अनुक्रमे २६०५१, ४७३२ व ३२८० पदे अशी एकूण ३४०६३ पदे रिक्त आहेत. यात पदोन्नती व सरळसेवा भरतीच्या रिक्त पदांचा समावेश आहे.

(२) महापारेषण कंपनीमध्ये ८५०० नवीन व रिक्त पदे भरण्याची घोषणा ही सुधारित प्रशासकीय रचनेपूर्वीच्या आकृतीबंधावर आधारित होती. महापारेषण कंपनीने त्यांच्या दिनांक १५/०६/२०२१ च्या आदेशान्वये तांत्रिक पदांचा आकृतिबंध मंजूर केला असून त्यानुषंगाने वर्ग-३ व वर्ग-४ मधील पदोन्नतीची व सरळसेवा पदे कंपनीच्या नियमाप्रमाणे भरण्याची कार्यवाही महापारेषण कंपनीकडून सुरु आहे.

दिनांक ०४/०१/२०२१ रोजी ओबीसी जनमोर्चा यांच्याद्वारे विदयुत सहायक पदाच्या भरतीसाठी सुमारे ६० ते ७० विद्यार्थ्यांसह प्रकाशगड येथे आंदोलन केले असल्याचे महावितरण कंपनीने अवगत केले आहे.

(३) व (४) महावितरण, महापारेषण व महानिर्मिती कंपन्यांकडून पदोन्नती व सरळसेवा भरतीची रिक्त पदे नियमानुसार, शासन निर्णयानुसार आणि न्यायालयाचे आदेश विचारात घेऊन भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

महावितरण कंपनीकडून विद्युत सहायक पदांसाठी (५००० पदे) जाहिरात सन २०१९ मध्ये प्रसिध्द करण्यात आली. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दिनांक ०५/०७/२०२१ अन्वये भरती प्रक्रिया राबविण्यासंदर्भात दिलेल्या मार्गदर्शक सूचना व उच्च न्यायालयात प्रलंबित याचिकांमध्ये दिलेल्या आदेशांच्या अनुषंगाने ई.डब्ल्यू.एस. प्रवर्ग वगळता इतर प्रवर्गातील निकाल प्रसिध्द करण्यात आला असून निवड झालेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांच्या पडताळणीनंतर पात्र उमेदवारांना नियुक्ती पत्र निर्गमित करण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## प्रादेशिक मनोरुग्णालय येरवडा, पुणे येथे अधीक्षक व उप अधीक्षक यांच्याविरुध्द केलेल्या तक्रारीबाबत

**(१०) ९८४५ (१५-०७-२०२१) श्री.सुरेश धस** : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रादेशिक मनोरुग्णालय येरवडा, पुणे येथे मनोरुग्णांची कोविड-१९ या आजारासंदर्भात कोणतीही उपाययोजना करण्यात आली नसल्यामुळे तेथील अनेक मनोरुग्णांना व कर्मचाऱ्यांना या आजाराची लागण होऊन त्यात काहींचा मृत्यू झाला असून अधीक्षक व उपअधीक्षक यांच्या जाचास कंटाळून अनेक रुग्ण पळून गेले असून काहींनी आत्महत्त्या केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मनोरुग्णालयात उपचार घेत असलेल्या विशाल जगताप या मनोरुग्णाला कोविड-१९ चा संसर्ग झाला असता त्याचेवर आंतररुग्ण म्हणून होत असलेल्या उपचाराबद्दल नातेवाईकांनी तक्रार केली असता समाजसेवा अधीक्षकांनी रुग्णाच्या नातेवाईकांना बोलवून रुग्णास घेऊन जाण्यास सांगितले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अधीक्षकांनी सदर मनोरुग्णालयात सुरक्षा रक्षकांची नेमणूक करतांना नॅशनल सिक्युरिटी अ‍ॅण्ड जनरल ट्रेड युनियन, मुंबई या सुरक्षा संस्थेशी संगनमत करून नियमबाह्यपणे पूर्वीपासून खाजगी सुरक्षा संस्थेचे गार्ड कार्यरत असल्याचे भासवून त्यांच्या नावांची शिफारस अधीक्षकांनी जिल्हा सुरक्षा मंडळाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात कोरोनाची तिसरी लाट ही लहान मुलांसाठी धोकादायक असेल असा टास्क फोर्स यांचा अंदाज असतानाही दुर्गम व आदिवासी भागात सार्वजनिक आरोग्य विभागाकडे पुरेसे बालरोगतज्ञ नसताना वरिष्ठ अधिकाऱ्यांनी डॉ.अभिजित फडणीस यांची बालरोगतज्ञ म्हणून अन्य ठिकाणी नियुक्ती न करता त्यांना मनोरुग्णालयाच्या अधीक्षक पदी नियुक्ती करण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, प्रादेशिक मनोरुग्णालय येरवडा, पुणे येथील अधीक्षक डॉ.अभिजित फडणीस यांच्या मनमानी कारभारामुळे कर्मचाऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असून सदरहू अधीक्षकांची अन्य ठिकाणी बदली किंवा नियुक्ती करण्याबाबत तसेच अधीक्षक व उप अधीक्षक यांच्याविरुध्द केलेल्या तक्रारीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (३१-०१-२०२२) :** (१) व (२) सन २०२१ मध्ये प्रादेशिक मनोरुग्णालय येरवडा पुणे येथील मनोरुग्णालयातील एकूण ३८५ मनोरुग्णांना कोविड-१९ ची बाधा झाली होती. सदरील रुग्णावर कोविड-१९ च्या प्रचलित उपचार पध्दतीनुसार उपचार करण्यात आले आहेत. सन २०२० मध्ये १ व २०२१ मध्ये ६ असे एकूण ७ मनोरुग्णांचा कोविड-१९ या आजाराने उपचारादरम्यान ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे येथे मृत्यू झाला. प्रादेशिक मनोरुग्णालय, येरवडा, पुणे येथून १ मनोरुग्णाने पळून जाण्याचा प्रयत्न

केला असता त्याविषयी एफ.आय.आर. दाखल करण्यात आला. परंतु सदर मनोरुग्ण सापडल्यामुळे त्यास मनोरुग्णालयात भरती करण्यात आले. सदरील कालावधीत एकही मनोरुग्णाने आत्महत्या केलेली नाही.

श्री.विशाल जगताप हा मनोरुग्ण दिनांक १९ मार्च, २०२१ रोजी प्रादेशिक मनोरुग्णालय, येरवडा, पुणे येथे दाखल झाला होता. दिनांक २३ मार्च, २०२१ रोजी आंतररुग्ण पत्रिकेनुसार व कोविड-१९ चा रिपोर्ट सकारात्मक असल्याने श्री.विशाल जगताप यांच्या नातेवाईकांस बोलावण्यात येवून त्याबाबत माहिती देण्यात आली. परंतु सदर मनोरुग्णास प्रचलित उपचार पध्दतीनुसार मनोरुग्णालयातच उपचार देण्यात आलेले आहेत. सदर मनोरुग्ण दिनांक २५ मार्च, २०२१ ते ५ एप्रिल, २०२१ पर्यंत जिल्हा रुग्णालय, पुणे येथे दाखल होता व त्यानंतर त्याला ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे येथे दाखल करण्यात आले. त्याचा दिनांक १२ एप्रिल, २०२१ रोजी ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे येथे मृत्यू झाला.

(३) प्रादेशिक मनोरुग्णालय, येरवडा, पुणे येथे सुरक्षा रक्षकांची नियुक्ती सुरक्षारक्षक मंडळा मार्फत शासनाच्या प्रचलित नियमानुसार करण्यात आली आहे.

(४) व (५) प्रादेशिक मनोरुग्णालयात वैद्यकीय अधीक्षक म्हणून मनोविकृती या विषयातील तज्ञाची नेमणूक केली जाते. तथापि, सेवाजेष्ठतेनुसार मानसोपचार तज्ञाची संख्या कमी असल्यामुळे प्रादेशिक मनोरुग्णालय येरवडा पुणे येथे वैद्यकीय अधीक्षक म्हणून जिल्हा शल्यचिकित्सक संवर्गातील अधिकाऱ्यांना पदस्थापना दिलेली आहे.

वैद्यकीय अधीक्षक व प्रशासकीय अधिकारी प्रादेशिक मनोरुग्णालय येरवडा, पुणे यांचे कामात अनियमितता आढल्याने त्यांचे विरुध्द विभागीय चौकशीचा प्रस्ताव क्षेत्रिय कार्यालयाकडून प्राप्त झालेला आहे. सदरील प्रस्तावावर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात तसेच नाशिक जिल्ह्यातील जात पडताळणी समितीकडून विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र उपलब्ध होत नसल्याबाबत

**(११) १०२७१ (२९-०९-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तसेच नाशिक जिल्ह्यातील जात पडताळणी समितीकडे तीन ते चार महिन्यांपूर्वी अर्ज करुनही जात पडताळणी प्रमाणपत्र मिळत नसल्याने विद्यार्थी आणि पालकांमध्ये रोष व्यक्त होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२१ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्यवसायिक अभ्यासक्रम प्रवेशाची संधी हुकली जाऊ नये याकरीता जात प्रमाणपत्र मिळविण्याकरीता जात पडताळणी कार्यालयात मोठ्या प्रमाणात गर्दी असताना या विद्यार्थ्यांना तात्काळ प्रमाणपत्र देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने नाशिक व इतर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र विनाविलंब उपलब्ध व्हावे याकरीता संबंधित जिल्ह्याच्या जात पडताळणी समितीच्या समिती प्रमुखांना शासनस्तरावरुन सूचना देण्यात आल्या आहेत काय तसेच जात प्रमाणपत्र मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (१९-०१-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषी, वास्तुशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, व्यवस्थापन शास्त्र, आयूर्वेद व इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांकरीता राखीव जागेवर प्रवेश घेणारे अर्जदार जात प्रमाणपत्र पडताळणीबाबतचे अर्ज संबंधित समितीकडे विलंबाने सादर करीत असल्याची बाब निदर्शनास आली आहे. अनेक विद्यार्थी आयत्या वेळेत अर्ज करतात, त्यामुळे समितीचा कामाचा ताण वाढतो.

(२) शासनस्तरावरुन वेळोवेळी निर्गमित होणारे शासन निर्णय, परिपत्रके यानुसार अर्जदार यांना विहित वेळेत वैधता प्रमाणपत्र मिळणेसाठी समित्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच समिती कार्यालयाकडूनही अर्जदारास प्रत्यक्ष मार्गदर्शन करण्यात येऊन अर्जदार व पालकांना माहिती देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना त्यांचे प्रस्ताव समितीकडे विहित वेळेत देणेबाबत वर्तमान पत्राव्दारे बार्टी स्तरावरुन व समिती स्तरावरुन आवाहन केले जाते. सध्या सर्व जाती प्रमाणपत्र पडताळणी समित्यांची प्रक्रिया ऑनलाईन केली आहे. तसेच सेवाशुल्क सुध्दा पेमेंट गेटवेव्दारे ऑनलाईन पध्दतीने स्विकारले जाते. जात वैधता प्रमाणपत्र ई-मेल व्दारे दिले जाते. तसेच जात वैधता प्रमाणपत्र पडताळणीच्या ऑनलाईन प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करण्यासाठी जिल्हा निहाय ऑनलाईन वेबीनारचे आयोजन करण्यात येते.

(३) प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याकरीता वेळोवेळी मा.मंत्री, सामाजिक न्याय, मा.अपर मुख्य सचिव व बार्टी स्तरावरुन आढावा घेण्यात येवून, प्रलंबित प्रकरणे प्राधान्याने निकाली काढण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## प्रसुती रजेचा लाभ सरोगेट आईलाही देय ठरविण्याचा शासन निर्णय निर्गमित करणेबाबत

**(१२) १०६३४ (१८-११-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने अभिमान काळेमेघ हायस्कूल, मंरूळपेठ (जि.अमरावती) येथील सहाय्यक शिक्षिका शुभांगी कृष्णराव हेडावू यांनी दाखल केलेल्या याचिकेबाबत माहे सप्टेंबर, २०२१ रोजी निर्णय दिला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रसुती रजेचा लाभ सरोगेट आईलाही देय ठरविण्याबाबतचा शासन निर्णय मा.शालेय शिक्षणमंत्र्यांनी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तात्काळ निर्गमित करण्याची मागणी नागपूर विभागाच्या शिक्षक जनप्रतिनिधींनी दिनांक ०८/०९/२०२१ रोजी शासनास निवेदन पाठवून केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच, सदरहू शासन निर्णय केव्हापर्यंत निर्गमित करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२०-१२-२०२१) :** (१) होय.
(२) व (३) सरोगसी पध्दतीने जन्मलेल्या अपत्याचे संगोपन करण्यासाठी महिला कर्मचाऱ्यांना "विशेष रजा" मंजूर करण्याबाबत वित्त विभागाच्या क्रमांक सरजा-२०१५/प्र.क्र.९/१५/सेवा-६, दिनांक २०/०१/२०१६ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या रजा नियमांत सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## शासनाच्या विविध विभागामध्ये रिक्त जागांवर अनुकंपातत्वावरील उमेदवारांना नौकरी देण्याबाबत

**(१३) १०७०७ (२०-११-२०२१) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.सुधीर तांबे, श्री.मोहनराव कदम, श्री.जयंत आसगावकर, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय सेवेत असताना कर्मचाऱ्यांचे निधन झाल्यास त्यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीला अनुकंपा तत्वावर नोकरी दिली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या जवळपास १६००० तर स्थानिक स्वराज्य संस्थांतील जवळपास ५० हजार उमेदवार अनुकंपा नियुक्तीच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रतिक्षा यादीतील ४५ वर्षांची वयोमर्यादा ओलांडलेल्या उमेदवारांची संख्या वाढली असून सन २००५ नंतर शासकीय सेवेत आलेल्या कर्मचाऱ्यांना पेन्शनचा लाभ मिळत नाही तसेच राज्य शासनाच्या विविध विभागामध्ये ३ लाखापेक्षा जास्त जागा रिक्त असतानासुध्दा अनुकंपा तत्वावर नोकरी देण्यासाठी शासनस्तरावर त्याची अंमलबजावणी होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मागील १३ वर्षांपासून अनुकंपा नियुक्त्या न दिल्याने अनुकंपा नियुक्त्या प्रक्रिया जलद गतीने पूर्ण होण्यासाठी शासनाने दिनांक २६ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्या सुमारास आदेश पारित करुन कार्यपध्दतीत सुधारणा करुन सरळसेवा भरतीस मान्यता असलेल्या पदांपैकी २० टक्के पदावर अनुकंपा तत्वावर नियुक्त्या देण्यासाठी सुचना केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाचा दिनांक २६ ऑगस्ट २०२१ च्या निर्णयानुसार कोणती कार्यवाही केली तसेच शासकीय कर्मचाऱ्यांतील गट अ आणि गट ब मधील अधिकाऱ्यांसाठी अनुकंपा धोरण लागू करण्याबाबत व अनुकंपातत्वारील उमेदवारांना लवकरात लवकर शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (०९-०२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

राज्य शासनाकडील प्रतिक्षा यादीवर १०,१६७ तसेच जिल्हा परिषदांकडील ६,०२३ उमेदवार अनुकंपा तत्त्वावरील प्रतिक्षासूचीवर नियुक्तीच्या प्रतिक्षेत आहेत.

(३) अनुकंपा तत्वावर नोकरी देण्यासाठी शासन स्तरावर त्याची अमंलबजावणी होत नाही, हे खरे नाही.

(४) व (५) अनुकंपा नियुक्तीच्या कार्यपध्दतीबाबत असणारा संभ्रम दूर करुन अनुकंपा नियुक्ती प्रक्रिया जलद गतीने पूर्ण करण्यास सहाय्यभूत होण्यासाठी दिनांक २६/०८/२०२१ च्या परिपत्रकान्वये अनुकंपा नियुक्तीची प्रमाणित कार्यपध्दती (SOP) प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच दिनांक २७/०९/२०२१ च्या आदेशान्वये अनुकंपा नियुक्तीचे धोरण गट-अ व गट-ब मधील शासकीय कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आले आहे.

मागील तीन महिन्यात गट-क ची २,५५५ व गट-ड ची १,०६७ अशी एकूण ३,६२२ पदे अनुकंपा नियुक्तीद्वारे भरण्यात आली आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मराठावाडा विभागाचा अनुशेष दूर करण्याबाबत

**(१४) १०९७२ (०६-०१-२०२२) श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा विभाग शैक्षणिक, आर्थिक व समाजिकदृष्टया मागास असल्यामुळे त्याचा अनुशेष पूर्ण झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाडा विभागाचा अनुशेष भरण्याबाबत राज्य शासनाकडून विशेष पॅकेज देण्यात येणार आहे काय,

(३) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (३१-०१-२०२२) :** (१) व (२) "निर्देशांक व अनुशेष समिती" ने ३१ मार्च, १९९४ अखेरचा विकास मंडळ निहाय व विकास क्षेत्रनिहाय दर्शविलेला एकूण रुपये १४००६.७७ कोटी अनुशेष निश्चित केला होता.त्यापैकी, मराठवाडा विकास मंडळ क्षेत्राच्या रुपये ४००४.५५ कोटीच्या अनुशेषाचे निर्मुलन करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विद्यार्थ्यांना सरल प्रणाली अंतर्गत स्टुडंट पोर्टलमध्ये आधार क्रमांक नोंद करण्याकरीता मुदतवाढ देण्याबाबत

**(१५) १११४१ (१८-११-२०२१) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळांमधील विद्यार्थ्यांना सरल प्रणाली अंतर्गत स्टुडंट पोर्टलमध्ये आधार क्रमांक नोंद करण्याची सक्ती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोविड परिस्थितीमुळे अनेक विद्यार्थी शाळाबाहय झाल्याने आधार नोंदणीस उशीर होत असल्यामुळे आधार क्रमांक नोंदणीस मुदतवाढ देण्याबाबतची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुदतवाढ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२०-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) अशा स्वरुपाचे निवेदन प्राप्त आहे.

(३) विद्यार्थ्यांची शाळेमधील उपस्थिती किंवा अनुपस्थिती याचा आधार नोंदणीशी परस्पर संबंध नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पाण्याची गुणवत्ता तपासणाऱ्या प्रयोगशाळांचे खाजगीकरण करण्याबाबत

**(१६) १११९३ (१७-११-२०२१) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वच्छ व शुध्द पाणी उपलब्ध करून देण्याऱ्या पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळांचे खाजगीकरण करण्यासाठी शासनाकडून प्रयत्न सुरू आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या बाह्यस्थ संस्थेमार्फत करण्यात येणार असल्याने त्याचा परिणाम राज्यातील ८२० कर्मचाऱ्यांवर होणार असून त्यामध्ये रत्नागिरी जिल्हयातील ११ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे, हे खरे आहे काय, तसेच, उक्त प्रयोगशाळांचे खाजगीकरण करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील ८२० कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (०६-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत राज्यात सध्या एकूण १८३ प्रयोगशाळा मंजूर असून त्यापैकी ६ विभागीय, २८ जिल्हा व १४३ उपविभागीय अश्या एकूण १७७ प्रयोगशाळा कार्यरत आहेत. या प्रयोगशाळांचे खाजगीकरण करण्याचे कोणतेही प्रयत्न शासनामार्फत सुरू नाहीत.

शासनाच्या दिनांक ०४ सप्टेंबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या जल जीवन मिशन कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार केंद्र शासनाने सुचविलेल्या मनुष्यबळाव्यतिरिक्त आवश्यकतेप्रमाणे अन्य मनुष्यबळ बाहय संस्थेद्वारे उपलब्ध करून घेण्याचे निर्देश आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भंडारा जिल्हयातील शेतकऱ्यांना पणन महासंघाकडून रब्बी धानाचे चुकारे अदा करण्याबाबत.

**(१७) ११२८० (१९-११-२०२१) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे पणन महासंघाच्या माध्यमातून आधारभूत खरेदी केंद्रावर विकलेल्या धानाचे २५८ कोटी १७ लाख चार हजार ५१ रुपयांचे चुकारे थकीत असून जिल्ह्यातील ४३ हजार ३८५ शेतकऱ्यांनी १८ लाख ३९ हजार ७२२ क्विंटल धानाची विक्री केली असून शेतकऱ्यांना अद्याप चुकारे मिळाले नसून शेतकरी आर्थिक संकटात आले असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या रब्बी धानाचे चुकारे अदा करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांनी पणन महासंघाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन भंडारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना तातडीने रबी धानाचे चुकारे अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (१४-१२-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

भंडारा जिल्ह्यात खरीप पणन हंगाम २०२०-२१ मध्ये खरेदी केलेल्या संपूर्ण धानाचे चुकारे शेतकऱ्यांना ऑगस्ट, २०२१ पूर्वी अदा करण्यात आले आहे.

तथापि, रब्बी पणन हंगाम २०२०-२१ मधील दिनांक ३१/०७/२०२१ पर्यंत झालेल्या धान खरेदीचे रुपये ११९.७१ कोटी एवढया रकमेचे शेतकऱ्यांचे चुकारे प्रलंबित होते. सदर रुपये ११९.७१ कोटी प्रलंबित चुकारे दिनांक ०७/०९/२०२१ अखेर शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात आले आहेत.

(२) होय.

(३) भंडारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे संपूर्ण चुकारे अदा करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कडा व आष्टी (जि.बीड) तालुक्यात पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्याने आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत

**(१८) ११४४८ (०२-१२-२०२१) श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कडा (जि.बीड) तालुक्यात गहु, तांदुळाचा काळाबाजार होत असून तेथील गोरगरिब जनतेसाठी असलेली डाळ त्यांना मिळत नाही तसेच, आष्टी तालुक्यात पुरवठा विभागाकडे १९२ स्वस्त धान्य दुकानदाराच्या माध्यमातुन दरमहा वाटप करण्यात येणाऱ्या धान्य वाटपातही अनियमितता आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, कडा व आष्टी येथील गोडावूनमधून मागील कोटयातुन वाटपासाठी शिल्लक राहिलेली ११८ क्विंटल डाळ दुकानदाराने लाभार्थ्यांना वितरीत केली नसल्याने पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी सदरहू डाळीचा पुरवठा करताना आर्थिक गैरव्यवहार केल्याचे दिनांक २० मे, २०२० रोजी निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (१०-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

रास्तभाव दुकानदारांमार्फत लाभार्थ्यांना देय असलेले अन्नधान्य ई-पॉस द्वारे वितरीत करण्यात येते. त्यामुळे ऑनलाईन अन्नधान्य वितरणात कोणताही गैरप्रकार झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

कडा व आष्टी येथील शासकीय गोदामातून माहे जून, २०२० अखेर शिल्लक असलेल्या ११०.९६ क्विंटल चणाडाळीपैकी अंत्योदय लाभार्थ्यांना प्रति कार्ड १ किलो प्रमाणे ३६.२५ क्विंटल तसेच प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांना प्रति कार्ड १ किलो प्रमाणे ७४.७१ क्विंटल अशी एकूण ११०.९६ क्विंटल चणाडाळ

रास्तभाव दुकानदार यांचेमार्फत शिधापत्रिका धारकांना वितरित करण्यात आली आहे, असे तहसिल आष्टी यांनी केलेल्या चौकशीमध्ये निदर्शनास आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कल्याण-डोंबिवली महापालिकेतून वगळलेल्या २७ गावांपैकी १० गावांच्या सहयोगाने कल्याण विकास केंद्र (कल्याण-ग्रोथ सेंटर) उभारण्याबाबत

**(१९) ४२८८९ (०२-०८-२०१८) श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुलाच्या धर्तीवर कल्याण-डोंबिवली महापालिकेतून वगळलेल्या २७ गावांपैकी १० गावांच्या सहयोगाने कल्याण विकास केंद्र (कल्याण-ग्रोथ सेंटर) उभारण्यासाठी शासनाने माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घोषणा केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त केंद्राच्या उभारणीसाठी शासनाने किती निधीची तरतूद केली असून केंद्राकरीता आवश्यक भूसंपादन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०७-०१-२०२२) :** (१) होय हे खरे आहे.

(२) व (३) प्राधिकरणाच्या दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी झालेल्या १३८ व्या बैठकीत पारित केलेल्या ठराव क्रमांक १३४० अन्वये प्रस्तावित कल्याण ग्रोथ सेंटरमधील पायाभुत सोयी-सुविधा विकसीत करण्याकरीता अंदाजे रुपये १०८९ कोटीच्या तरतूदीस मान्यता देण्यात आली आहे. तथापि, अद्‌याप भुसंपादनाची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

सुरुवातीस स्थानिक गावकऱ्यांच्या विरोधामुळे सर्वेक्षणाचे काम स्थगित करण्यात आले होते. सद्य:स्थितीत ड्रोन सर्व्हेने सदर सर्वेक्षणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

---

## मुंबईत माजी पंतप्रधान दिवंगत अटलबिहारी वाजपेयी यांचे स्मारक उभारण्याबाबत

**(२०) ४४१२७ (०५-१२-२०१८) :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनातर्फे मुंबईत माजी पंतप्रधान दिवंगत अटलबिहारी वाजपेयी यांचे स्मारक उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी निर्णय घेण्यात आला आहे काय, निर्णयाचे स्वरुप काय आहे व तदनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१४-१२-२०२१) :** (१), (२) व (३) दिनांक ०४/०१/२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील निदेशाप्रमाणे मा.माजी पंतप्रधान भारतरत्न स्वर्गीय अटलबिहारी वाजपेयी यांचे मुंबईमध्ये स्मारक उभारणी करण्याच्या अनुषंगाने प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका व जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांना दिनांक १२ मार्च, २०२१ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.